किरकोळ अर्ज नं ८१/2026

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो जयसिंगपूर यांचे कोर्टात

Exh.21
Order
Seen.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.07.06 17:19:30 +0530

सौ. रागिनी अरविंद कोडेकर — फिर्यादि/अर्जदार

विरुद्ध

महाराष्ट्र सरकार — वि.प.

यातील अभियोग पक्षातर्फे म्हणणे असे की,

1) अर्जदार यांनी त्यांचे अर्जातील कलम ३ मधील अ.नं 1 ते 10 मधील विविध वित्तिय संस्था मधील कर्ज खाते खुले करून मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सदरचा गुन्हा हा महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 चे कलम 45, 46 प्रमाणे तसेच BNS. 2023 चे कलम 352, 351(2) प्रमाणे गुन्ह्याशी संबंधित आहे.

२) सदर गुन्ह्यात एकुण 27 तोळे सोने व 150gm चांदीपैकी 9 तोळे सोने व 150gm चांदीचा मुल्यवान वस्तूंचा समावेश आहे

3) सदर गुन्ह्यातील काही दागिने जप्त करणेत आले असून उर्वरित दागिन्यांबाबत तपास करून जप्त करणे बाकी आहे.

4) यातील मुख्य आरोपी गुन्हा दाखल झाले पासून फरारी असून आरोपी याने मौल्यवान मुद्देमाल हा तारण ठेवून कर्ज काढलेले असून सदर मुद्देमाल बाबत तपास बाकि आहे.

5) तसेच अर्जदार यांनीहि गुन्ह्यातील मौल्यवान मुद्देमाल हा तारण ठेवून कर्ज काढलेले असून त्याबाबत तपास बाकि आहे.

6) यातील अर्जदार यांनी तारण ठेवलेल्या दागिन्याचे मालकी हक्काबाबत आजपर्यंत कोणतीहि कागदपत्रे सादर केलेली नाहित तरी सदर दागिन्याबाबत तपास होणे गरजेचे आहे.

7) अर्जदार यांनी गुन्ह्यातील तारण घेतलेले दागिने हे नमुद खात्यामध्ये तारण ठेवून बेकायदेशीर कर्जखाते व कर्ज काढलेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) सदर अर्जदार यांचे कर्ज खात्यातील दागिने हे फिर्यादी व अन्य लोकांकडून तारण घेतलेचे तपासी अधिकारी यांना निष्पन्न झालेले आहे.

9) सदर अर्जदार यांचे मागणीप्रमाणे कर्ते खाते खुले केल्यास अर्जदार हे गैरवापर करुन दागिने सोडवून घेतेची व त्यांची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे त्याचे मुळ स्वरुपात बदल होवून भविष्यात ओळख निश्चितीचा प्रश्न उद्भवू शकतो.

तरी. सदरचा अर्ज नामंजूर व्हावा ही विनंती.

मे जा. व्हावे

जयसिंगपूर

ता. 6/7/2026

(सहा.सरकारी अभियोक्ता)